# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# औरंगाबाद परिमंडल, औरंगाबाद.
## प्रकरण क्र. सीजीआरएफ/एझेड/ग्रामीण/६७४/२०१८/१४

**(नोदंणी क्रमांक २०१८०४००२७)**

| | |
|---|---|
| तक्रार दाखल | दिनांक :- २७.०३.२०१८ |
| निकाल | दिनांक :- १९.०६.२०१८ |

श्री. विकास रामचंद्र धानुरे — तक्रारदार
सारा सार्थक, वडगांव कोल्हाटी,
वाळुज,
औरंगाबाद ४३१००१
(ग्राहक क्रमांक ४९२१३०४५२२६४)

## विरुध्द

कार्यकारी अभियंता (प्रशासन), — गैरअर्जदार
नोडल ऑफिसर,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी म.
ग्रामीण मंडल,
औरंगाबाद.

| | | |
|---|---|---|
| ग्राहक प्रतिनिधी | : | सौ. मीरा विकास धानुरे,<br>वडगांव (को), औरंगाबाद |
| कंपनी प्रतिनिधी | : | श्री. पी. पी. तोडकर, उपकार्यकारी अभियंता<br>ग्रामीण उपविभाग-१,<br>औरंगाबाद. |

## मंच

| | |
|---|---|
| १) श्रीमती शोभा. बी. वर्मा | अध्यक्ष |
| २) श्री. लक्ष्मण मु. काकडे | तांत्रिक सदस्य / सचिव |
| ३) श्री. विलासचंद्र सु. काबरा | सदस्य |

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच -निर्णय

१) अर्जदार श्री. विकास रामचंद्र धानुरे, सारा सार्थक, वडगांव कोल्हाटी, वाळुज, औरंगाबाद यांनी त्यांचे भाऊ श्री. विठ्ठल रामचंद्र धानुरे यांनी चुकीच्या पध्दतीने लाईट बील ग्राहक क्रमांक ४९२१३०४५२२६४ स्वतःच्या नावे करुन घेतले असून सदर लाईट बील त्यांच्या म्हणजे श्री. विकास रामचंद्र धानुरे यांच्या नावे करुन मिळावे यासाठी त्यांनी गैरअर्जदार कार्यकारी अभियंता तथा नोडल ऑफिसर, महावितरण, शहर मंडल, औरंगाबाद यांचे विरुध्द महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ यातील परिशिष्ट -अ नमुन्यात दिनांक १०.०४.२०१८ रोजी तक्रार दाखल केली आहे.

२) तक्रारदार श्री. विकास रामचंद्र धानुरे यांनी दिनांक १५.११.२०१६ रोजी उपकार्यकारी अभियंता, ग्रामीण उपविभाग-१, औरंगाबाद यांच्या कार्यालयात ग्राहक क्रमांक ४९२१३०४५२२६४ चे बील श्री. विकास ऐवजी विठ्ठल नावाने येत आहे, आधार कार्ड व खरेदी खताच्या आधारे नावात बदल करण्यात यावा, अशी तक्रार दाखल केली.

३) तक्रारदार श्री. विकास रामचंद्र धानुरे यांनी दिनांक २८.११.२०१६ रोजी उपकार्यकारी अभियंता, महावितरण, ग्रामीण उपविभाग-१, औरंगाबाद यांच्या कार्यालयात पुन्हा तक्रार अर्ज दिला. तक्रारीमध्ये म्हटले आहे की, जुलै २०१७ च्या वीज बिलामध्ये ग्राहक क्रमांक ४९२१३०४५२२६४ च्या बिलामध्ये चुकीचे नांव रद्द करुन विकास हे नांव लावले होते. परंतु आता पुन्हा विठ्ठल यांचे नांव आले आहे. तरी मुळ कागदपत्रांची शहनिशा करुन योग्य ती कार्यवाही करावी व बरोबर नाव विकास असे लावुन द्यावे.

४) तक्रारदार श्री. विकास रामचंद्र धानुरे यांनी दिनांक २८.११.२०१६ रोजी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, महावितरण, ग्रामीण मंडल, औरंगाबाद यांचेकडे (ग्राहक क्रमांक ४९२१३०४५२२६४) तक्रार दाखल केली. तक्रारी मध्ये म्हटले की, ''माझे नावाचे विकास रामचंद्र धानुरे या नावाने या चालु लाईट बिलामध्ये माझ्या भावाने श्री. विठ्ठल रामचंद्र धानोरे याने नावात बदल करुन घेतला आहे. तरी लाईट बील माझ्या नावे म्हणजे विकास

रामचंद्र धानोरे या नावाने मिळावे. तसेच महावितरण कंपनीच्या स्थानिक कार्यालयातून तक्रार निवारणार्थ प्रतिसाद मिळाला नाही.'' अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, महावितरण, ग्रामीण मंडल, औरंगाबाद यांनी पत्र क्रमांक आयजीआरसी/एआरसी/ग्रा/२०१७-१८/ आयडी क्र. १६/२०१८ दिनांक १२.०१.२०१८ रोजी आदेश पारित केला, आदेशामध्ये म्हटले की,

''१) वीज जोडणी मंजूर करतांना ज्या कागदपत्रांच्या आधारे वीज जोडणी देण्यात आली त्या कागदपत्रांची तपासणी करावी.

२) जोडण्यात आलेली कागदपत्रे खोटी आढळल्यास अथवा पुरविण्यास सध्याच्या ग्राहकाने असमर्थता दाखविल्यास सदरच्या ग्राहकाचा वीज पुरवठा कायमचा खंडीत करण्यात यावा.''

५) अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, महावितरण, ग्रामीण मंडल, औरंगाबाद यांच्या आदेशाची कार्यवाही न झाल्याने तक्रारदार यांनी या मंचाकडे दिनांक १०.०४.२०१८ रोजी तक्रार दाखल केली. तक्रारी मध्ये म्हटले की, ''माझे भावाने चुकीच्या पध्दतीने माझ्या नावे असलेल्या प्लॉटवरचे लाईट बील स्वतःच्या नावे करुन घेतले आहे ते माझे नावे करुन मिळावे.''

६) गैरअर्जदार उपकार्यकारी अभियंता, महावितरण, ग्रामीण उपविभाग-१, औरंगाबाद यांनी त्यांचे म्हणणे दिनांक ०८.०५.२०१८ रोजी सादर केले. त्यात म्हटले की, श्री. विठ्ठल रामचंद्र धानुरे, ग्राहक क्रमांक ४९२१३०४५२२६४ यांना वीज जोडणी घेतांना सदरील मालमत्ता त्यांच्या नावे असल्याचा पुरावा म्हणुन नमुना-८ सन २००८-०९ प्राप्त झाला असून नमुना -८ चा उतारा पाहता वीज जोडणी घेतांना २००९ साली सदरील मालमत्ता श्री. विठ्ठल रामचंद्र धानोरे यांच्या नावे असल्याचे दिसून येते. गैरअर्जदार यांनी दिनांक १५.०५.२०१८ रोजी पुन्हा वाचण्यायोग्य अशा नमुना-८ उतारा, श्री. विठ्ठल रामचंद्र धानुरे यांचे नावे पाणीपट्टी व कर वसुली पावती, तसेच कोटेशन भरल्याची पावती इत्यादी कागदपत्रे दाखल केली.

७) गैरअर्जदार उपकार्यकारी अभियंता, महावितरण, ग्रामीण उपविभाग-१, औरंगाबाद यांनी कनेक्शन देते वेळी जोडलेल्या कागदपत्रामध्ये श्री. विठ्ठल रामचंद्र धानुरे यांचे नावे गट नं. ५४, प्लॉट नं. ९६ चा नमुना नं. ८ (२००८-०९), पाणीपट्टी (२०१४-१५) करपावती मंचाकडे सादर केल्यामुळे श्री. विठ्ठल रामचंद्र धानुरे यांना या मंचाने हजर राहून त्यांची बाजू मांडण्याचे दिनांक १५.०५.२०१८ रोजी आदेश दिले.

८) तक्रारदार श्री. विकास रामचंद्र धानुरे यांनी दिनांक २२.०५.२०१८ रोजी दस्तऐवज सादर केले, त्यामध्ये ग्रामपंचायत नमुना-८ उतारा (सन २०१५ ते २०१६ व २०१८ ते २०१९) मध्ये श्री. विकास रामचंद्र धानुरे यांचे नावे गट नं. ५४, निरंकार नगर, मालमत्ता क्रमांक २७२४ क्षेत्रफळ ७१८ चौ. फुट असा दाखला आहे. तसेच ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत, वडगांव कोल्हाटी, ता. जि. औरंगाबाद यांच्या समिती प्रोसिडिंग बुक (इतिवृत्त) दिनांक २२.०५.२०१७ रोजीची प्रत सादर केली. त्यामध्ये श्री. विकास रामचंद्र धानुरे यांच्या अर्जावरील निर्णयाबाबत ग्राम विकास अधिकारी यांनी सांगितले की, ''श्री. विठ्ठल रामचंद धानुरे यांना दोन वेळा सुचना नोटीस तादिल करण्यात आली आहे. परंतु जागेच्या खरेदी बाबत पुरावा सादर केला नाही. त्यामुळे चर्चेअंती श्री. विठ्ठल रामचंद्र धानोरे यांच्या नावाची नोंद रद्द करुन विकास रामचंद्र धानुरे यांचे नाव लावण्यास मान्यता देण्यात आली.''

९) श्री.विठ्ठल रामचंद्र धानुरे यांनी दिनांक ०५.०६.२०१८ रोजी लेखी म्हणणे सादर केले, त्यात म्हटले की,

> ''१) श्री. विकास रामचंद्र धानुरे यांनी चुकीचा अर्ज केला असून मी दिनांक **०३.०६.२००९** पासून वीज पुरवठा घेतला आहे. तो आजपर्यंत चालु आहे. श्री. विकास रामचंद्र धानुरे यांनी जुलै २०१७ मध्ये कोणतीही परवानगी न घेता त्यांचे नाव लावले, त्यानंतर अर्ज देऊन मी माझे नांव लावले आहे.''
>
> २) सदर मालमत्ता माझ्या नावावर सन २००८ मध्ये आली आहे व आजपर्यंत मालमत्ता कर भरुन आहे. त्याबाबत २०१४-१५ व २०१६-१७ गट क्रमांक ५४,

निरंकार नगर, क्षेत्रफळ ७१८ चौ. फुट असा विठ्ठल रामचंद्र धानुरे नावाची कर पावती जोडली आहे.

३) श्री. विकास रामचंद्र धानुरे व मी सख्खे भाऊ असून एकत्र मिळकती खरेदी केल्या आहेत. त्यामध्ये गट नं. ५४, प्लॉट नं. ९६ ही मिळकत मला वाटप झाली आहे.

४) श्री. विकास रामचंद्र धानुरे यांनी खोटी कागदपत्रे देऊन मुळ मालक श्री. गायके यांचेकडुन खोटी कागदपत्रे मंचाकडे दाखल केली आहेत.

५) सदर मिळकत माझ्या ताब्यात असून वीज पुरवठा रद्द करु नये.

६) सदर मालमत्ता मी दिनांक १५.१०.२०१६ रोजी श्री. परमेश्वर धानुरे याना विकली असून त्यांचे खरेदीखत व टॅक्स पावती जोडली आहे.

७) ग्रामपंचायत ठरावामध्ये माझ्या मिळकतीचा उल्लेख नाही.

८) माझी मालमत्ता क्रमांक २७२४ असून विकास रामचंद्र धानुरे यांनी दाखल केलेल्या खरेदी खता मध्ये मिळकत क्रमांक ४००५ असा दाखविला आहे. त्यामुळे ते खरेदीखत माझ्या मालमत्तेला लागू होत नाही.

९) ग्रामपंचायत यांनी माझे नांव रद्द केले असे दिनांक २२.०५.२०१७ रोजी म्हटले आहे ते २०१६ मध्ये कमी होऊन श्री. परमेश्वर विठ्ठल धानुरे असे नांव आले.

यावरुन वरील माहिती खरी असून श्री. विकास रामचंद्र धानुरे हे मालमत्ता हडप करत असल्याने अर्ज रद्द करण्यात यावा अशी मागणी केली.

१०) तक्रारदार श्री. विकास रामचंद्र धानुरे यांनी दिनांक ०५.०६.२०१८ रोजी पुरवणी निवेदन दिले त्यात म्हटले की,

१) मी श्री. खंडेराव लहानू गायके यांच्याकडुन दिनांक २२.१२.२००६ रोजी गट क्रमांक ५४ मधील प्लॉट क्रमांक ९६ खरेदी केला. त्याचे खरेदी खत व रजिस्ट्रीची प्रत सादर केलेली आहे.

२) मला दिनांक ०३.०६.२००९ रोजी वीज जोडणी दिली. तिचा ग्राहक क्रमांक ४९२१३०४५२२६४ असून जुलै २०१७ पर्यंत देण्यात येत असलेल्या वीज बिलावर माझे म्हणजे श्री. विकास रामचंद्र धानुरे असे नांव आहे.

३) मी अर्ज केला नसतांना बिलात श्री. विठ्ठल रामचंद्र धानुरे असा बदल केला तो मला मान्य नाही.

४) चुकीच्या नावाने देण्यात येणाऱ्या वीज बिला विरुध्द महावितरणकडे दिनांक १५.११.२०१७ व २८.११.२०१७ रोजी तक्रार दाखल केली होती. कार्यवाही न झाल्यामुळे दिनांक २९.११.२०१७ रोजी महावितरणच्या अंतर्गत तक्रार निवारण कक्षाकडे तक्रार दाखल केली. अंतर्गत तक्रार निवारण कक्षाने दिलेल्या आदेशानंतर देखील कागदपत्रे तपासण्यात न आल्यामुळे मंचाकडे तक्रार दाखल केली.

५) तक्रारदाराने प्रार्थना केली की, तक्रार मान्य करण्यात यावी व श्री. विकास रामचंद्र धानुरे या नावाने वीज बील देण्यात यावे. आर्थिक व मानसिक त्रासाबद्दल महावितरणला बजावण्यात यावे. तसेच मानसिक त्रासापोटी व खर्चापोटी दोषी असलेल्या कर्मचाऱ्यास रुपये ५०००/- दंड आकारण्यात यावा.

११) वरील प्रमाणे अर्जदार, गैरअर्जदार यांनी सुनावणी दरम्यान सादर केलेले दस्तऐवज, मांडलेले म्हणणे, याचा विचार करता मंच खालील प्रमाणे निष्कर्ष काढत आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दा** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १) | ग्राहक क्रमांक ४९२१३०४५२२६४ चे नावातबदल करुन वीज बील श्री. विकास रामचंद्र धानुरे यांचे नावे करण्यात यावे का ? | होय |
| २) | आदेश ? | सोबत प्रमाणे |

## कारणे

**१२) <u>मुद्दा क्रमांक १ :-</u>** तक्रारदार श्री. विकास रामचंद्र धानुरे यांची गट क्रमांक ५४ मधील प्लॉट क्रमांक ९६ (क्षेत्रफळ ७१८ चौ. फुट) च्या मालकी संदर्भातील दिनांक २२.१२.२००६ रोजीचा सादर केलेला खरेदी करारनामा (पान क्रमांक २३) ज्यामध्ये श्री. विकास रामचंद्र धानुरे यांनी श्री. खंडेराव लहानु गायके यांचेकडुन सदर प्लॉट खरेदी करारनामा प्रमाणे खरेदी केला असे दिसते. तसेच सादर केलेल्या दस्तऐवजावरुन सदर गट क्रमांक ५४ मधील प्लॉट क्रमांक ९६ (क्षेत्रफळ ७१८ चौ. फुट) चे निवासी सहन प्लॉट खरेदीखत / रजिस्ट्री दिनांक १०.११.२०१७ रोजी श्री. खंडेराव लहानु गायके यांचेकडुन खरेदी केल्याचे (पान क्रमांक २१) दिसून येते. ग्रामपंचायत वडगांव कोल्हाटी यांनी सन २००८ साली श्री. विठ्ठल रामचंद्र धानुरे यांच्या नावाची नोंद ग्रामपंचायत उतारा-८ मध्ये मालक म्हणुन केली होती. परंतु जेव्हा श्री. विकास रामचंद्र धानुरे यांनी सदर नोंद चुकीची असल्याबाबत व मालकीबाबत ग्रामपंचायत येथे अर्ज केला. तेव्हा ग्रामपंचायत वडगांव कोल्हाटी यांनी श्री. विकास रामचंद्र धानुरे यांच्या तक्रार अर्जानुसार ग्रामपंचायत नमुना ८ उतारा व नमुना १० हा गट नं. ५४, निरंकार नगर, प्लॉट नं. ९६ मध्ये ठराव क्रमांक ०९ दिनांक २२.०५.२०१७ च्या आधारे श्री. विठ्ठल रामचंद्र धानुरे यांनी खरेदी बाबत पुरावा सादर न केल्यामुळे श्री. विठ्ठल रामचंद्र धानुरे नांव रद्द करुन श्री. विकास रामचंद्र धानुरे अशी नोंद केली. त्याप्रमाणे (पान क्रमांक ७७, ८८) ग्रामपंचायत नमुना ८ उतारा व नमुना नं. १० करपावती श्री. विकास रामचंद्र धानुरे यांच्या नावाने देण्यात आली.

यावरुन गट नं. ५४, निरंकार नगर, प्लॉट नं. ९६ (क्षेत्रफळ ७१८ चौ. फुट) मिळकत क्रमांक २७२४ यावर श्री. विकास रामचंद्र धानुरे यांचा प्रथम दर्शनी मालकी हक्क दिसून येतो.

१३) श्री. विठ्ठल रामचंद्र धानुरे यांनी सादर केलेल्या दस्तऐवजांमध्ये स्वतःच्या खरेदी बाबत कागदपत्रे दाखल केली नाहीत. विद्युत पुरवठा त्या ठिकाणी दिनांक ०३.०६.२००९ पासून आहे. श्री. विठ्ठल रामचंद्र धानुरे यांनी वीज कोटेशन भरतांना जोडलेली नमुना ८

उतारा व कर पावती (२०१४-१५) त्यांच्या नावाने जोडली आहे. परंतु ग्रामपंचायत वडगांव कोल्हाटी यांनी ठरावाने सदर नोंद दिनांक २२.०९.२०१७ रोजी रद्द करुन श्री. विकास रामचंद्र धानुरे या नावाने दिनांक ०३.०४.२०१८ रोजी ग्रामपंचायत नमुना ८ व नमुना १० कराबद्दल पावती असा बदल केला आहे. त्यामुळे प्रथम दर्शनी श्री. विकास रामचंद्र धानुरे हा जागेचा मालक आहे. त्यामुळे श्री. विठ्ठल रामचंद्र धानुरे हे जरी तेथे राहत असले तरी विद्युत कनेक्शन प्रथमतः मालकाचे नावे असणे कायदेशीर आहे. सबब, विकास रामचंद्र धानुरे या नावाने बदल करणे योग्य ठरेल. त्यामुळे मुद्दा क्रमांक -१ चे उत्तर होय असे नोंदविण्यात येत आहे.

१४) सुरुवातीला २००९ साली श्री. विठ्ठल रामचंद्र धानुरे यांचे नाव गैरअर्जदार यांनी वीज बिलावर नमुना क्रमांक ८-अ च्या उताऱ्यावर आधारुन लावले होते. तदनंतर श्री. विकास रामचंद्र धानुरे यांनी तक्रार केली व त्यांचे खरेदी करार गैरअर्जदार यांचेकडे सादर केला. गैरअर्जदार यांनी त्यांचे नांव जुलै २०१७ मध्ये वीज बिलावर नोंदविले. त्यानंतर पुन्हा श्री. विठ्ठल रामचंद्र धानुरे यांच्या अर्जावरुन गैरअर्जदार यांनी श्री. विकास रामचंद्र धानुरे यांचे नांव वीज बिलावरुन कमी केले. परंतु तसे करतांना त्यांनी श्री. विकास रामचंद्र धानुरे यांचे म्हणणे ऐकुण घेतले नाही अथवा योग्य चौकशी केलेली दिसत नाही. त्यामुळे सदरचे तक्रारीस कारण घडलेले दिसते. तरी यापुढे गैरअर्जदार यांनी अशा प्रकरणामध्ये कागदपत्रांची छानणी करावी व उभय पक्षाचे म्हणणे ऐकुण घेऊन त्यानंतर कार्यवाही करावी.

१५) श्री. विठ्ठल रामचंद्र धानुरे हे सदर ठिकाणी राहत असल्याचे म्हटले आहे. तथापि संपत्ती व मालकी वारसा बाबत दोन्ही पक्षकारांनी मा. दिवाणी न्यायालय यांचेकडुन निर्णय घेणे उचित ठरेल. (Nature of the property & inheritance right of the parties are required to be decided by Civil Court)

१६) अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, ग्रामीण मंडल, औरंगाबाद यांचे आदेशाची सुध्दा गैरअर्जदार यांनी अंमलबजावणी केलेली दिसून येत नाही.

वरील कारणास्तव मुद्दा क्रमांक २ चे उत्तरादाखल खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१) तक्रारदाराचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२) ग्राहक क्रमांक ४९२१३०४५२२६४ चे वीज बील श्री. विठ्ठल रामचंद्र धानुरे यांचे नावाचे रद्द करुन श्री. विकास रामचंद्र धानुरे यांचे नावे करण्यात यावे.

३) खर्च ज्याचा त्याने सोसावा.

४) केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या मंचास ३० दिवसात देण्यात यावा.

| | | |
|---|---|---|
| स्वाक्षरीत | स्वाक्षरीत | स्वाक्षरीत |
| श्रीमती शोभा बी. वर्मा | लक्ष्मण मु. काकडे | विलासचंद्र सु. काबरा |
| अध्यक्ष | सदस्य/सचिव | सदस्य |